# कर्नाटक माध्यमिक शिक्षण परीक्षा मंडळ

## मल्लेश्वरम, बेंगळूर – 03

## एस. एस. एल. सी – 2019 – 20

## शालेय विद्यार्थ्यांसाठी

## प्रश्नपत्रिकेचा सुधारित आराखडा

## (अभ्यासक्रमावर आधारित)

## विषय – प्रथम भाषा मराठी

## विषय संकेत – 08M

# विषय – प्रथम भाषा मराठी

# विषय संकेत – 08M

**प्रस्तावना : –**

राष्ट्रीय अभ्यासक्रमाच्या बदललेल्या स्वरूपानुसार मुल्यमापनाचा दर्जात्मक विकास साधण्यासाठी, भाषिक कौशल्य विकसित करण्यासाठी, विद्यार्थ्यांच्या क्षमता व सामर्थ्य विस्तिर्ण करण्यासाठी प्रश्नपत्रिकेच्या स्वरूपामध्ये विधायक बदल करण्यात आले आहेत.

**महत्वाचे मुद्दे :** इतर विषयांच्या प्रश्नपत्रिकेप्रमाणेच प्रथम भाषा मराठीमध्ये सुध्दा सन 2019 – 20 सालापासून बदल करण्यात आले आहेत.

भाषेची मूलभुत कौशल्ये (लेखन, भाषण, वाचन, श्रवण इ.) प्राप्त करणे हा भाषा शिकण्याचा मूळ हेतू असतो. सद्य परीक्षा पध्दतीचा विचार केल्यास एक गोष्ट लक्षात येते की ही परीक्षा पध्दत गुणकेंद्रीत असून यामध्ये भाषेचे मूलभूत उद्देश दुर्लक्षित केले जात आहेत.

पाठांतर करून उत्तरे लिहिण्याच्या प्रक्रियेला आळा घालण्यासाठी स्मरण उद्दिष्ट्याचे गुण कमी करण्यात आले. सामुहीक कॉपी प्रकार थांबविण्यासाठी वस्तुनिष्ठ प्रश्नांची संख्या कमी करण्यात आली आहे. तसेच लेखन कौशल्याला प्राधान्य देण्यासाठी वर्णनात्मक प्रश्नातून विद्यार्थ्यांच्या अभिव्यक्तीला व सृजनशील लेखनाला वाव देण्यात आला आहे. प्रश्नसंख्या 50 वरून 45 एवढी करण्यात आली आहे.

आताची अध्ययन–अध्यापन पध्दत ही गुणांना महत्व देणारी आहे हे विद्यार्थी, शिक्षक व पालक सर्वानाच माहित आहे. म्हणून घटकानुसार गुणविभागणी रद्द करण्यात आली असून घटक आधारित अध्यापनही रद्द करण्यात आले आहे. विद्यार्थी व शिक्षकांनी सर्व पाठ्यघटकांचा समग्र अभ्यास सर्व घटकांना समान महत्व देऊन करावा म्हणून समग्रविषय गुणपध्दत अवलंबिली आहे. उदा. गद्य, पद्य, व्याकरण, रचना, अपठित उतारा इ. प्रत्येक घटकाला दिलेले गुण हे कायमस्वरूपी नाहीत.

पूर्वीच्या प्रश्नपत्रिकेमध्ये गद्य, पद्य–अ भाग, व्याकरण–ब भाग व रचना–क भाग अशी विभागणी होती. ते स्वरूप बदलून आता गुणांच्या चढत्या क्रमाने प्रश्नक्रमांक दिले आहेत. त्यामुळे प्रथम भाषेच्या सर्व विषयामध्ये एकसूचना आणण्याचा प्रयत्न केला आहे. प्रत्येक घटकावर आधारित जो स्वाध्याय दिलेला असतो त्यातीलच प्रश्न येतील असे न होता त्याव्यतिरिक्त घटकावर आधारित कोणताही प्रश्न येऊ शकतो. त्यामुळे विद्यार्थ्यांना सर्व घटकांचा सखोल अभ्यास करावा लागेल. प्रश्नपत्रिकेची काठीण्य पातळी पूर्वीप्रमाणेच सारखी ठेवण्यात आली आहे.

**प्रश्नपत्रिका स्वरूपात झालेला तुलनात्मक बदल**

**प्रथम भाषा मराठी – 08M**

**एकूण गुण – 100          शालेय विद्यार्थ्यांसाठी          वेळ – 3 तास**

**प्रश्नपत्रिका आराखडा – 2019 – 20**

## 1. उद्देशानुसार गुणविभागणी

| उद्देश | 2018 – 19 | | 2019 – 20 | |
|---|---|---|---|---|
| | गुण | शेकडा | गुण | शेकडा |
| स्मरण | 25 | 25 | 21 | 21 |
| आकलन | 37 | 37 | 36 | 36 |
| अभिव्यक्ती | 34 | 34 | 39 | 39 |
| रसग्रहण | 04 | 04 | 04 | 04 |
| **एकूण** | **100** | **100** | **100** | **100** |

- पाठांतर करून उत्तरे लिहिण्याच्या प्रक्रियेला आळा घालण्यासाठी स्मरण या उद्दिष्ट्याचा गुणभार 25% वरून 21% करण्यात आला आहे.
- विद्यार्थ्यांच्या अभिव्यक्तीला चालना देण्यासाठी अभिव्यक्ती उद्दिष्ट्याचा गुणभार 34% वरून 39% पर्यंत वाढवला आहे.
- आकलन आणि रसग्रहण उद्दिष्ट्याचा गुणभारामध्ये काही बदल करण्यात आला नाही.

## 2. विषयानुसार गुणविभागणी

| विषय वस्तू | 2018 – 19 | | 2019 – 20 | |
|---|---|---|---|---|
| | गुण | शेकडा | गुण | शेकडा |
| गद्य | 34 | 34 | 34 | 34 |
| पद्य | 33 | 33 | 33 | 33 |
| व्याकरण | 20 | 20 | 16 | 16 |
| रचना | 13 | 13 | 13 | 13 |
| अपठित उतारा | - | - | 04 | 04 |
| **एकूण** | **100** | **100** | **100** | **100** |

- प्रश्नपत्रिका आराखडा तयार करताना प्रत्येक प्रथम भाषेसाठी 9 गुण पूरक वाचनासाठी राखीव ठेवण्यात आले आहेत. पण प्रथम भाषा मराठी पाठ्यपुस्तकात पुरक वाचन नसल्यामुळे 9 मार्क गद्य व पद्य विभागात विभागले आहेत.
- कौशल्य विकासासाठी 4 गुण देण्यात आलेले आहेत. हे चार गुण अपठित उतारा या प्रश्नासाठी घेण्यात आलेले आहेत.

## 3. प्रश्नप्रकारानुसार गुणविभागणी

| प्रश्नप्रकार | 2018 – 19 | | 2019 – 20 | | वेळ<br>वाचन 15 मि. |
|---|---|---|---|---|---|
| | गुण | शेकडा | गुण | शेकडा | |
| बहुपर्यायी (1 मार्क) | 10 | 10 | 06 | 06 | 15 मि. |
| परस्पर संबंध ओळखा (1 मार्क) | 04 | 04 | 04 | 04 | |
| एका वाक्यात उत्तरे (1 मार्क) | 11 | 11 | 07 | 07 | 15 मि. |
| थोडक्यात उत्तरे (दोन–तीन वाक्ये) (2 मार्क) | 09 | 18 | 10 | 20 | 35 मि. |
| दीर्घोत्तरी उत्तरे (पाच–सहा वाक्ये) (3 मार्क) | 09 | 27 | 11 | 33 | 45 मि. |
| दीर्घोत्तरी उत्तरे (आठ– दहा वाक्ये) (4 मार्क) | 05 | 20 | 05 | 20 | 30 मि. |
| दीर्घोत्तरी (रचनेवर आधारित) (5 मार्क) | 02 | 10 | 02 | 10 | 25 मि. |
| **एकूण** | **50** | **100** | **45** | **100** | **165 + 15 = 180 मि.** |

- वरील तक्त्याप्रमाणे प्रश्नांचे प्रकार असतील.
- वस्तुनिष्ठ प्रश्न, संबंध जुळवा, एका वाक्यात उत्तरे हे सर्व प्रश्न एका गुणासाठी आहेत.
- थोडक्यात उत्तरे द्या 2 मार्कासाठी, व 3, 4, 5 मार्कासाठी दिर्घोत्तरी प्रश्न दिलेले आहेत.
- प्रश्नपत्रिका सोडविण्यासाठी एकूण 3 तास कालावधी असेल.
- वस्तुनिष्ठ प्रश्नांची संख्या 10 वरुन 6 करण्यात आली आहे. संबंध जुळवा या प्रश्नांसंदर्भात बदल झाला नाही.
- एका वाक्यात उत्तरे द्या प्रश्नांची संख्या 11 वरुन 7 करण्यात आली आहे.
- थोडक्यात उत्तरे द्या 10 प्रश्न, दीर्घोत्तरी 3 गुणासाठी 11 प्रश्न, दीर्घोत्तरी 4 गुणांसाठी 5 प्रश्न आहेत. (यामध्ये पाठांतर कविता व अपठित उतारा यांचा समावेश आहे)
- 5 मार्काच्या दीर्घोत्तरी प्रश्नामध्ये पत्र व निबंधलेखनाचा समावेश आहे.
- विद्यार्थ्यांना एकूण 25% प्रश्नासाठी पर्याय निवडता येतील. ज्यामध्ये निबंध, पत्र, कल्पनाविस्तार, कविता पूर्ण करा, दोन दीर्घोत्तरी प्रश्नांचा समावेश असेल.

## 4. काठीण्य पातळीनुसार गुणविभागणी

| सोपे | साधारण | कठीण |
|---|---|---|
| 30% | 50% | 20% |

- प्रश्नांच्या काठिण्य पातळीमध्ये कोणताच बदल करण्यात आला नाही.

# कर्नाटक माध्यमिक शिक्षण परीक्षा मंडळ
# 2019-20 नमुना प्रश्नपत्रिका – 1

**विषय : मराठी** **बहिस्त विद्यार्थ्यांसाठी** **विषय संकेत : 08M**

**वेळ : 3.15 तास** **एकूण अंक : 125**

## 1. उद्देशानुसार गुणविभागणी

| उद्देश | 2018 – 19 | | 2019 – 20 | |
|---|---|---|---|---|
| | गुण | शेकडा | गुण | शेकडा |
| स्मरण | 31 | 25 | 27 | 21 |
| आकलन | 47 | 37 | 44 | 36 |
| अभिव्यक्ती | 43 | 34 | 50 | 40 |
| रसग्रहण | 04 | 04 | 04 | 03 |
| **एकूण** | **125** | **100** | **125** | **100** |

- पाठांतर करून उत्तरे लिहिण्याच्या प्रक्रियेला आळा घालण्यासाठी स्मरण या उद्दिष्ट्याचा गुणभार 25% वरून 21% करण्यात आला आहे.
- विद्यार्थ्यांच्या अभिव्यक्तीला चालना देण्यासाठी अभिव्यक्ती उद्दिष्ट्याचा गुणभार 34% वरून 40% पर्यंत वाढवला आहे.
- आकलन आणि रसग्रहण उद्दिष्ट्याचा गुणभारामध्ये काही बदल करण्यात आला नाही.

## 2. विषयानुसार गुणविभागणी

| विषय वस्तू | 2018 – 19 | | 2019 – 20 | |
|---|---|---|---|---|
| | गुण | शेकडा | गुण | शेकडा |
| गद्य | 47 | 37 | 44 | 35 |
| पद्य | 45 | 36 | 44 | 36 |
| व्याकरण | 20 | 17 | 20 | 16 |
| रचना | 13 | 10 | 13 | 10 |
| अपठित उतारा | - | - | 04 | 03 |
| **एकूण** | **125** | **100** | **125** | **100** |

## 3. प्रश्नप्रकारानुसार गुणविभागणी

| क्षश्नप्रकार | 2018 – 19 | | 2019 – 20 | |
|---|---|---|---|---|
| | आुण | शेकडा | गुण | शेकडा |
| बहुपर्यायी (१ मार्क) | 10 | 10 | 10 | 10 |
| परस्पर संबंध ओळखा (1 मार्क) | 04 | 04 | 05 | 05 |
| एका वाक्यात उत्तरे (1 मार्क) | 16 | 16 | 08 | 08 |
| थोडक्यात उत्तरे (दोन–तीन वाक्ये) (2 मार्क) | 16 | 32 | 15 | 30 |
| दीर्घोत्तरी उत्तरे (पाच–सहा वाक्ये) (3 मार्क) | 11 | 33 | 14 | 42 |
| दीर्घोत्तरी उत्तरे (आठ– दहा वाक्ये) (4 मार्क) | 05 | 20 | 05 | 20 |
| दीर्घोत्तरी (रचनेवर आधारित) (5 मार्क) | 02 | 10 | 02 | 10 |
| **एकूण** | **64** | **125** | **59** | **125** |

- बहुपर्यायी प्रश्नात काही बदल करण्यात आला नाही.
- सहसंबंध जुळवा प्रश्नांची संख्या 4 वरुन पाच करण्यात आली आहे.
- एका वाक्यातील उत्तरे प्रश्नांची संख्या 16 वरुन 8 अशी केली आहे. व थोडक्यात उत्तरे द्या या प्रश्नांची संख्या 16 वरुन 15 करण्यात आली आहे.
- दीर्घोत्तरी 3 मार्काच्या प्रश्नांची संख्या 11 वरुन 14 करण्यात आली आहे.

## 4. काठीण्य पातळीनुसार गुणविभागणी

| सोपे | साधारण | कठीण |
|---|---|---|
| 30% | 50% | 20% |

# कर्नाटक माध्यमिक शिक्षण परीक्षा मंडळ
# 2019-20 नमुना प्रश्नपत्रिका – 1

**विषय : मराठी** **शालेय विद्यार्थ्यांसाठी** **विषय संकेत : 08M**

**वेळ : 3 तास** **एकूण अंक : 100**

**I पुढील प्रश्नांना प्रत्येकी चार पर्याय दिलेले आहेत. त्यापैकी योग्य पर्याय निवडून उत्तर लिहा. 6X1=6**

1. दिगंबर या शब्दाचा संधीविग्रह असा होतो.

   अ) दिक् + बर ब) दिग् + अंबर क) दिक् + अंबर ड) दिग् + बर

2. षष्ठी विभक्तीचे प्रत्यय कोणते?

   अ) स, ला, ते ब) ने, ए, शी क) ऊन, हून ड) चा, ची, चे

3. ज्याची खावी पोळी त्याची ........... म्हण पूर्ण करा.

   अ) वापरावी थाळी ब) वाजवावी टाळी क) वाजवावी शिटी ड) बांधावी मोळी

4. 'घरोघरी' या सामासिक शब्दाचा प्रकार कोणता?

   अ) तत्पुरुष समास ब) द्वंद्व समास क) बहुव्रीही समास ड) अव्ययीभाव समास

5. खालीलपैकी 'विशेषनाम' ओळखा.

   अ) पर्वत ब) शिखर क) हिमालय ड) गिरी

6. 'भानू' या शब्दाचा समानार्थी शब्द ओळखा.

   अ) सुधाकर ब) आदित्य क) सुधांशु ड) हिमांशु

**II पहिल्या दोन पदातील संबंध ओळखून तिसऱ्या पदाचा योग्य संबंध लिहा. 4X1=4**

7. तो घरी जातो : कर्तरी प्रयोग : : त्याने चोराला पकडले : _______
8. मी गावाला जाईन : भविष्यकाळ : : तो पुस्तक वाचत आहे : _______
9. समाजाची सेवा करणारा : समाजसेवक : : सभेत भाषण करणारा : ______
10. सुसंगत : विसंगत : : आधार : ________

**III पुढील प्रश्नांची एका वाक्यात उत्तरे लिहा. 7X1=7**

11. हतीला पाहण्यासाठी कोण गेले होते?
12. सर्वांसाठी विषय व्यवस्था कोण करतो?
13. वसईवर कोणाचा अंमल होता?
14. विद्या कशाप्रकारे आहे?
15. लोकांना कोण फसवते?
16. गाव कशानी वेढलेले आहे?
17. दुःखाची ज्योत कशी तेजाळते?

**IV खालील प्रश्नांची उत्तरे सुचनेप्रमाणे लिहा.** **3X2=6**

18. वाक्यप्रचाराचा अर्थ सांगून वाक्यात उपयोग करा.
    अ) पांग फेडणे ब) पाणउतारा करणे
19. अलंकार ओळखून लक्षणे लिहा.
    हटा तटाने पटा रंगवूनि जटा धरिशी का शिरी
20. गण पाडून वृत्त ओळखा
    पोटासाठी भटकत जरी दूर देशी फिरेन

**V खालील प्रश्नांची उत्तरे दोन–तीन वाक्यात लिहा.** **7X2=14**

21. "तुम्ही त्यांशी कशासाठी भांडता? तो पुण्यवान आहे." संदर्भासहित स्पष्टीकरण करा.
22. लेखक अनंत काणेकर यांचा परिचय लिहा.
23. गंगूबाईनी आपल्या गुरुंना कोणती गुरुदक्षिणा दिली.
24. संत ज्ञानेश्वरांचा परिचय लिहा.
25. गुराख्याच्या जीवाची आग का होते?
26. कामावर जाण्यापूर्वी 'ती' पहाटेला कोणती कामे करते?
27. 'पाठ आणि पोट यांचा झाला टाळ, अभंगाचे बळ अमर्याद' संदर्भासहित स्पष्टीकरण करा.

**VI खालीलपैकी कोणत्याही एका कल्पनेचा विस्तार करा.** **1X3=3**

28. अ) मरावे परि कीर्तीरूपे उरावे ब) प्रयत्नांती परमेश्वर

**VII खालील प्रश्नांची उत्तरे पाच सहा वाक्यात लिहा.** **10X3=30**

29. लेखकाने काकूना कायमचा रामराम का ठोकला?
30. मदर्स युनियन या संस्थेची माहिती लिहा.
31. जांभळाच्या झाडाबद्दल लेखकाच्या कोणकोणत्या आठवणी आहेत?
32. तात्यांना धाकट्या मुलाचा राग का येत होता? का?
33. सावित्रीबाई शाळेत जाऊ लागल्यावर लोकांच्या प्रतिक्रिया काय होत्या?
34. श्रीकृष्णाची प्राप्ती न झाल्यास रूक्मिणी काय करणार आहे?
35. 'जरा तरी समज धरी अंतरी' असे कवी का म्हणतो?

    **किंवा**

    ढोंगी धर्मगुरूचे वर्तन कसे असते?
36. पाहुणे कसे निगरट्ट आहेत?
37. पृथ्वी सूर्याची याचना कशी करत आहे?
38. हिरव्या तृणपात्याचा सत्कार का व कसा करण्यात आला?

**VIII खालील प्रश्नांची उत्तरे आठ दहा वाक्यात लिहा.** **4X4=16**

39. मेळघाटाच्या सुधारणेसाठी रविंद्र कोल्हे यानी केलेले कार्य कोणते?
40. आपला मुलगा पास झाल्याचा आनंद आक्का का व्यक्त करू शकत नव्हती?

**किंवा**

आडावरून पाणी घेऊन येताना लेखक कोणत्या प्रश्नांच ओझ्ञ घेऊन येतो?

41. कवी कोणाकोणाचे गुणगान करू इच्छितो? का?
42. पुढील कवितेच्या ओळी पूर्ण करा.

| | | |
|---|---|---|
| या भारतात बंधूभाव .................................. | | जातिभाव ......................................... |
| .............................................................. | **अथवा** | ........................................................ |
| .............................................................. | | ........................................................ |
| ............................................. राष्ट्रभावना | | ............................................... बावरी |

**IX पुढे दिलेला उतारा वाचून त्याखालील दिलेल्या प्रश्नांची उत्तरे तुमच्या शब्दात लिहा. 1X4=4**

43. चंद्राजवळ गेल्यावर अंतराळवीरानी यानाचा वेग कमी केला.अंतराळवीर आर्मस्ट्राँग व ऑल्ड्रिन हे दोघे सरपटत चांद्रयानात शिरले. त्यांनी हे यान मुख्य यानापासून वेगळे केले. त्यांचा तिसरा सहकारी कॉलीन्स अंतराळ यानातच थांबला. तो त्या दोघांच्या परतण्याची वाट पाहात चंद्राभोवती घिरट्या घालत होता. आर्मस्ट्राँग व ऑल्ड्रिन यांचे चांद्रयान हळूहळू चंद्रभूमीकडे चालले होते. चांद्रयान नेमके कोणत्या जागी उतरावयाचे हे आर्मस्ट्राँगने नीट न्याहाळून पाहिले. हळूहळू त्याने आपले यान चंद्रभूमीवर एका सपाट जागी उतरविले. पृथ्वीवरील सर्व लोक चंद्रावरील स्वारीसंबंधीच्या बातमीकडे अगदी कान लावून बसले होते. शेवटी 21 जुलै 1969 रोजी यान चंद्रावर उतरले. विज्ञानाने आणखी एक पाऊल पुढे टाकले.

प्रश्न :– 1) एवढे धाडस करून हे अंतराळवीर चंद्रावर का गेले?

2) चंद्रावर यान उतरवताना ते हळूहळू का न्यावे लागले असेल?

**X खालीलपैकी कोणत्याही एका विषयावर पत्र लेखन करा.** **1X5=5**

44. तुमच्या वाढदिवसाला तुमच्या गावी येण्याचे आमंत्रण देणारे पत्र तुमच्या मित्राला / मैत्रिणीला लिहा.

**किंवा**

तुमच्या भागात वीजपुरवठा सुरळीत करण्यासाठी हेस्कॉमच्या अधिकाऱ्यांना तक्रार अर्ज लिहा.

**XI खालीलपैकी कोणत्याही एका विषयावर पंधरा ते वीस ओळी निबंधलेखन करा.** **1X5=5**

45. राष्ट्रीय एकात्मता

**किंवा**

आई – एक परम दैवत

# कर्नाटक माध्यमिक शिक्षण परीक्षा मंडळ

# 2019-20 नमुना प्रश्नपत्रिका – 2

**विषय : मराठी** **शालेय विद्यार्थ्यांसाठी** **विषय संकेत : 08M**

**वेळ : 3 तास** **एकूण अंक : 100**

**I पुढील प्रश्नांना प्रत्येकी चार पर्याय दिलेले आहेत. त्यापैकी योग्य पर्याय निवडून उत्तर लिहा. 6X1=6**

1. खालीलपैकी कोणत्या शब्दात व्यंजन संधी साधली आहे?

   अ) सज्जन ब) दुरात्मा क) कवीश्वर ड) गणेश

2. पंचमी विभक्तीचे प्रत्यय कोणते?

   अ) स, ला, ते ब) चा, ची, चे क) ऊन, हून ड) नो

3. 'थेंब थेंब तळे साचे' या म्हणीतून कोणत्या गोष्टीचे महत्व सुचविले आहे?

   अ) पाणी ब) पैसा क) परिश्रम ड) बचत

4. बहुव्रीही समासाचे उदाहरण ओळखा.

   अ) पापपुण्य ब) गृहस्थ क) नीळकंठ ड) पुरणपोळी

5. पुढीलपैकी क्रीयाविशेषण अव्यय ओळखा.

   अ) महेश ब) हुशार क) भरभर ड) पक्षी

6. सजातीय या शब्दाचा विरुध्दार्थी शब्द ओळखा.

   अ) अजातीय ब) उपजातीय क) जातीय ड) विजातीय

**II पहिल्या दोन पदातील संबंध ओळखून तिसऱ्या पदाचा योग्य संबंध लिहा. 4X1=4**

7. लोकांनी चोर पकडला : कर्मणी प्रयोग : : तो गाणे गातो : _______
8. कोल्हा निघून जाईल : भविष्यकाळ : : तो गावी गेला : _______
9. सभेत भाषण करणारा : वक्ता : : मृत्यूवर विजय मिळविणारा : _______
10. अत्याचार : जुलूम : : आज्ञा : _______

**III पुढील प्रश्नांची एका वाक्यात उत्तरे लिहा. 7X1=7**

11. हत्ती सुपासारखा असे कोणत्या अंधाला वाटले?
12. खंडोजी माणकरने कोणते कार्य पत्करले?
13. वसईचा वेढा या पाठाचे मूल्य काय?
14. पाहुणे म्हणून घरी कोण यावे असे कवीला वाटते?
15. विरहिणी म्हणजे काय?
16. विठ्ठलाच्या पोटी काय आहे?
17. भूकेलेली पोरे कशी धावतात?

**IV खालील प्रश्नांची उत्तरे सुचनेप्रमाणे लिहा.** **3X2=6**

18. वाक्यप्रचाराचा अर्थ सांगून वाक्यात उपयोग करा.
    अ) काळाला जिंकणे ब) हस्तगत करणे
19. अलंकार ओळखून लक्षणे लिहा.
    माझे माहेर म्हणजे जणू गोकूळच
20. गण पाडून वृत्त ओळखा
    तदितर खग भेगे वेगळाले पळाले

**V खालील प्रश्नांची उत्तरे दोन–तीन वाक्यात लिहा.** **7X2=14**

21. "जात्यंध हस्ती ते पाहो गेले." संदर्भासहित स्पष्टीकरण करा.
22. विद्या महासागरासारखी आहे म्हणजे काय?
23. "कोपऱ्यातील छत्री घेऊ नका" असे दुकानदार का म्हणतो?
24. डॉ. संध्या देशपांडे यांचा परिचय लिहा.
25. इंद्रजित भालेराव यांचा परिचय लिहा.
26. धरण बांधताना तिने कोणते कष्ट सोसले?
27. "कुठून आणतात तेल हळदीच्या वाटीचे बळ" संदर्भासहित स्पष्ट करा.

**VI खालीलपैकी कोणत्याही एका कल्पनेचा विस्तार करा.** **1X3=3**

28. अ) ग्रंथ हेच गुरु ब) भाव तोचि देव

**VII खालील प्रश्नांची उत्तरे पाच सहा वाक्यात लिहा.** **10X3=30**

29. हाऊस वाइव्हज या संस्थेची माहिती लिहा.
30. जंगलात पानगळीच्या दिवसात कोणते दृश्य दिसते?
31. डॉक्टरांनी शिबीरामध्ये कोणकोणत्या गोष्टीची माहिती दिली?
32. तात्यांना धाकट्या मुलाचा राग का येत होता?
33. आपल्या मुलगा पास झाल्याचा आनंद आक्का का व्यक्त करत नव्हती?
34. आपण श्रीकृष्णाला मनाने वरले आहे हे रुक्मीणी त्याला कसे सांगते?
35. धर्माच्या नावाखाली ढोंगी गुरु काय–काय करतो?
36. पाहुण्यांच्या वर्तनाने आई का कंटाळून गेली आहे?
37. समाजसेवक कोणते काम करतात?

    **किंवा**

    मार्कंडेयाची तुलना कवीने देशभक्ताशी का केली आहे?
38. पृथ्वीचे प्रेम मिळाले म्हणून कोण–कोण कशाप्रकारे याचना करत आहेत?

**VIII खालील प्रश्नांची उत्तरे आठ दहा वाक्यात लिहा.** **4X4=16**

39. लेखकाच्या घरी काकूंचे आगमन कसे झाले?

**किंवा**

काकूच्या स्वभावाचे वर्णन तुमच्या शब्दात करा.

40. सावित्रीबाई खऱ्या अर्थाने सहधर्मचारिणी होत्या हे स्पष्ट करा.

41. भारत कशाप्रकारे असावा अशी संत तुकडोजींची अपेक्षा आहे?

42. पुढील कवितेच्या ओळी पूर्ण करा.

पहिल्या हिरव्या ....................................... म्हटले स्वागत..................................

........................................................... **अ** .........................................................

........................................................... **थ** .........................................................

............................................... ललकार **वा** ............................................... अत्तर

**IX पुढे दिलेला उतारा वाचून त्याखालील दिलेल्या प्रश्नांची उत्तरे तुमच्या शब्दात लिहा. 1X4=4**

43. मी एके दिवशी सायंकाळी नदीकाठी वाळूत बसलो होतो. जवळच नदीचा प्रवाह वाहत होता. नुकताच सूर्यास्त झाला होता. क्षितिजावर निरनिराळ्या रंगाच्या छटा उमटत होत्या. जवळच्या मंदिरातील सनईचे सूर वातावरणात घुमत होते. इतक्यात वरच्या बाजूला काही स्त्रीयांनी नदीच्या प्रवाहात सोडलेले लहान–लहान दिवे खाली वाहत येऊ लागले. पाण्यावर काढलेल्या रांगोळीप्रमाणे ते दिवे दिसत होते. हेलकावत दूर जात होते. मनात आले या दिव्याप्रमाणे जीवनात आनंदी राहता येईल का? अल्पकाळाचे या दिव्यांचे जीवन, पण मिळेल तेवढ्या वेळेत आनंदात राहणे हे यांना जमते. मग आपण मात्र एवढ्या–तेवढ्या कारणावरुन दुःखी होऊन बसतो. मग मात्र मी मनाशी निश्चय केला, की पुढे काही का होईना आपण आपल्या जीवनाचा प्रवास याच आनंदी वृत्तीने करायचा.

प्रश्न :– 1) लेखक एका सायकाळी नदीच्या काठी का बसला असेल?

2) या दिव्यावरुन लेखकाने मनाशी कोणता निश्चय केला?

**X खालीलपैकी कोणत्याही एका विषयावर पत्र लेखन करा.** **1X5=5**

44. दहावी परीक्षेत तुमच्या लहान भावाने केंद्रात प्रथम क्रमांक मिळवला आहे असे समजून त्याचे अभिनंदन करणारे पत्र लिहा.

**किंवा**

पाच दिवसाची सुट्टी मागण्यासाठी तुमच्या वर्गशिक्षकांना विनंती अर्ज लिहा.

**XI खालीलपैकी कोणत्याही एका विषयावर पंधरा ते वीस ओळी निबंधलेखन करा.** **1X5=5**

45. झाडे लावा, झाडे जगवा

**किंवा**

मोबाईल–फायदे व तोटे

# कर्नाटक माध्यमिक शिक्षण परीक्षा मंडळ

# 2019-20 नमुना प्रश्नपत्रिका – 1

**विषय : मराठी** **बहिस्त विद्यार्थ्यांसाठी** **विषय संकेत : 08M**

**वेळ : 3.15 तास** **एकूण अंक : 125**

**I पुढील प्रश्नांना प्रत्येकी चार पर्याय दिलेले आहेत. त्यापैकी योग्य पर्याय निवडून उत्तर लिहा. 10X1=10**

1. खालीलपैकी कोणत्या शब्दात व्यंजन संधी साधली आहे?
   अ) कवीश्वर ब) दुरात्मा क) सज्जन ड) गणेश
2. मराठीत एकूण किती विभक्ती मानल्या जातात?
   अ) सात ब) नऊ क) आठ ड) दहा
3. 'रमेश पुस्तक वाचतो' या वाक्यातील प्रयोग कोणता?
   अ) कर्मणी ब) कर्तरी क) भावे ड) अकर्मक भावे
4. 'श्वेता अभ्यास करील' या वाक्यातील काळ कोणता?
   अ) भविष्यकाळ ब) वर्तमानकाळ क) भूतकाळ ड) अपूर्ण भूतकाळ
5. कोणत्याही गोष्टीचा अतिरेक हा वाईटच असतो या आशयाची म्हण निवडा.
   अ) करावे तसे भरावे ब) अंथरुण पाहुन पाय पसरावे क)दाम करी काम ड) अति तेथे माती
6. खालीलपैकी द्वंद्व समासाचे उदाहरण कोणते?
   अ) नास्तिक ब) नवरात्र क) मीठभाकर ड) पितांबर
7. 'प्रामाणिक' हे कोणते नाम आहे?
   अ) विशेषनाम ब) सामान्यनाम क) भाववाचक नाम ड) सर्वनाम
8. नदी या शब्दाला समानार्थी शब्द कोणता?
   अ) ओढा ब) सरीता क) झरा ड) प्रवाह
9. मूर्तीपूजक या शब्दाचा विरुध्दार्थी शब्द ओळखा.
   अ) अमूर्त ब) मूर्तिकार क) मूर्तीभंजक ड) मूर्तिचोर
10. खालीलपैकी नपुसकलिंगी शब्द ओळखा.
    अ) झाड ब) खडू क) ग्रंथ ड) कादंबरी

**II पहिल्या दोन पदातील संबंध ओळखून तिसऱ्या पदाचा योग्य संबंध लिहा. 5X1=5**

11. देवालय : स्वरसंधी : : सदाचार : _______
12. महादेव : कर्मधारय समास : : पापपुण्य : _______
13. देशावर प्रेम करणारा : देशप्रेमी : : देव नाही असे मानणारा : ______
14. ? : प्रश्नचिन्ह : : ! : ________
15. मुजरा केला : ढगानी : : स्वागतगीत म्हटले : _______

**III पुढील प्रश्नांची एका वाक्यात उत्तरे लिहा.** **8X1=8**

16. सर्वांसाठी विषय व्यवस्था कोण करतो?
17. लोकांना कोण फसवते?
18. शाळेला जाऊन मुलांनी किती मार्क मिळविले?
19. तात्यांच्या घरी पंचमंडळी का जमली होती?
20. सावित्रीबाईंचे लग्न कोणाशी झाले?
21. लेखक आईला काय म्हणत असे?
22. परार्थीचा आप्तविस्तार कसा असतो?
23. गुराखी ढोरे कशी वळितो?

**IV खालील प्रश्नांची उत्तरे सुचनेप्रमाणे लिहा.** **3X2=6**

24. वाक्यप्रचाराचा अर्थ सांगून वाक्यात उपयोग करा.
    अ) जीव रंजीस येणे ब) कड दाटणे१
25. अलंकार ओळखून लक्षणे लिहा.
    लहान मूल म्हणजे मातीचा गोळा
26. गण पाडून वृत्त ओळखा
    मना सज्जना भक्ति पंथेचि जावे

**V खालील प्रश्नांची उत्तरे दोन-तीन वाक्यात लिहा.** **12X2=24**

27. डोळस मनुष्य आंधळ्यांना काय म्हणाला?
28. चिमाजी आप्पांनी कोणता निश्चय केला?
29. फिरंग्याची बायको नवऱ्याला काय म्हणाली?
30. "प्रत्येक इसमात शील असावे" संदर्भासहित स्पष्ट करा.
31. चि. वि. जोशी यांचा परिचय लिहा.
32. मुलांनी आजीबाई म्हणून हाक मारताच काकू काय म्हणाल्या?

    **किंवा**

    लेखक पाकगृहाच्या दारात उभे राहिल्यावर त्यांना कोणते दृश्य दिसले?
33. कवी नरेंद्र यांचा परिचय लिहा.
34. श्रीकृष्णाच्या प्राप्तीसाठी रूक्मिणीने काय – काय प्रयत्न केले?

    **किंवा**

    कृष्णाला काय आवडणार नाही?
35. होमामध्ये काय – काय जाळतात?
36. 'बाहेर मिरवीशी आत हरिशी वाकडे' याचा अर्थ काय?

37. पाहुण्यांना पाहुन बाळ्या का अचंबित झाला?

38. "हं हळू बोल – तनयाते" संदर्भासहित स्पष्टीकरण द्या.

**VI खालीलपैकी कोणत्याही एका कल्पनेचा विस्तार करा.** **1X3=3**

39. अ) करावे तसे भरावे ब) ग्रंथ हेच गुरू

**VII खालील प्रश्नांची उत्तरे पाच सहा वाक्यात लिहा.** **13X3=39**

40. लेखकाने पावसाळ्याचा हिशेब कसा मांडला आहे?
41. शिक्षणामुळे मुलांच्यात कोणता बदल झाला होता?
42. तिसरी वाटणी कुणी मागितली? का?
43. आपल्या मृत्यूपत्रात जोतिबा फुलेनी काय लिहिले होते?
44. लेखक कोणते दिवास्वप्न पाहात होते?
45. बेळगावी काँग्रेसमधील घटनांचे वर्णन करा.
46. हवा असलेला शकून सांगण्यासाठी कवी कावळ्याला काय – काय देऊ करतो?
47. समाजसेवक कोणते काम करतात?
48. मातीची मृत्यूवर मात म्हणजे काय?
49. काठी हातात आल्यावर गुराख्याने काय केले?
50. कामावर जाण्यापूर्वी ती स्त्री कोणकोणती कामे करते?
51. स्त्रीया स्वतःला कसे समजावतात?
52. भूकेलेले जीव काय–काय करतील असे कवी म्हणतो?

**VIII खालील प्रश्नांची उत्तरे आठ दहा वाक्यात लिहा.** **4X4=16**

53. मदर्स युनियन या संस्थेची माहिती लिहा.

**किंवा**

हाऊस वाईव्हज या संस्थेची माहिती लिहा.

54. जंगलात पानगळीच्या दिवसात कोणते दृश्य दिसते?

**किंवा**

हिरवे सांगाती पाठातील वृक्षांची वैशिष्ट्ये लिहा.

55. पृथ्वीचे प्रेम मिळावे म्हणून कोण व कसे प्रयत्न करत आहेत?

56. खालील कवितेच्या ओळी पूर्ण करा.

या भारतात ............................................

.................................................................

.................................................................

................................................ राष्ट्रभावना

**IX पुढे दिलेला उतारा वाचून त्याखाली दिलेल्या प्रश्नांची उत्तरे तुमच्या शब्दात लिहा. 1X4=4**

57. राजाज्ञा झाल्यामुळे दिवाणजींनी ती खोली उघडली. आतली पेटी उघडून दाखविली. त्यात एक फाटका अंगरखा, एक जीर्ण घोंगडे आणि बांबूची तुटकी बासरी होती. त्या मळकट वस्तू पाहून राजाने आश्चर्याने खुलासा विचारला. तेंव्हा दिवाणजी आदबीने म्हणाले, "राजे. या पदावर पोहोचण्यापूर्वी मी खेड्यात गुरे राखीत होतो. आपल्यासारख्या गुणग्राहकांचा स्पर्श झाला आणि मी या पदावर पोचलो! मी पूर्वी कोण होतो, याची नेहमी जाणीव रहावी यासाठी मी या वस्तू सांभाळून ठेवल्या आहेत. यांच्या दर्शनाने मी माझ्या कामाला रोज सुरूवात करतो. अशाने मला माझी लायकी कळते, लोभ वाढत नाही. कर्तव्याची जाणीव राहते." हे ऐकूण महाराजांना दिवाणजी विषयी कौतुक वाटले. महाराजांनी सोबत आलेल्या संशयखोर दरबारी लोकांकडे पाहिले. त्या सर्वांच्या माना खाली गेल्या होत्या. अपराधाची जाणीव त्यांच्या चेहऱ्यावर होती.

प्रश्न :– 1) महाराजांना दिवाणजीचे कौतुक का वाटले?

2) महाराजांनी दरबारी लोकांकडे का पाहिले असावे?

**X खालीलपैकी कोणत्याही एका विषयावर पत्र लेखन करा. 1X5=5**

58. तुमच्या मित्राचा एस. एस. एल. सी. परीक्षेत बोर्डात पहिला नंबर आला त्याचे अभिनंदन करणारे पत्र लिहा.

**किंवा**

तुमच्या निमंत्रणाला मान देऊन प्रजासत्ताक दिनी शाळेतील ध्वजारोहणाच्या कार्यक्रमाला उपस्थित राहिल्याबद्दल पाहुण्यांचे आभार मानणारे पत्र लिहा.

**XI** खालीलपैकी कोणत्याही एका विषयावर पंधरा ते वीस ओळी निबंधलेखन करा. **1X5=5**

59. ग्रामीण जीवनातील समस्या

**किंवा**

नकोत ते पाहुणे

# कर्नाटक माध्यमिक शिक्षण परीक्षा मंडळ
# 2019-20 नमुना प्रश्नपत्रिका – 2

**विषय : मराठी** **बहिस्त विद्यार्थ्यांसाठी** **विषय संकेत : 08M**

**वेळ : 3.15 तास** **एकूण अंक : 125**

**I पुढील प्रश्नांना प्रत्येकी चार पर्याय दिलेले आहेत. त्यापैकी योग्य पर्याय निवडून उत्तर लिहा. 10X1=10**

1. 'देवालय' या संधीचा विग्रह कसा कराल?
   अ) देव + अलय ब) देवा + आलय क) देव + आलय ड) देव् + आलय
2. ने, ए, शी हे विभक्ती प्रत्यय कोणत्या विभक्तीचे आहेत?
   अ) प्रथमा ब) द्वितीया क) तृतीया ड) चतुर्थी
3. 'मुलाने बैलास मारले' या वाक्यातील प्रयोग ओळखा.
   अ) कर्तरी ब) कर्मणी क) भावे ड) यापैकी नाही
4. 'मी कादंबरी लिहीन' या वाक्यातील काळ कोणता?
   अ) चालू वर्तमानकाळ ब) भूतकाळ क) वर्तमानकाळ ड) भविष्यकाळ
5. 'भित्यापाठी ब्रह्मराक्षस' या म्हणीचा अर्थ शोधा.
   अ) भीती न वाटणे ब) घाबरणे
   क) भित्र्या माणसासमोर संकट कोसळणे ड) जीव पटदिशी जाणे
6. महादेव या सामासिक शब्दाचा प्रकार ओळखा.
   अ) कर्मधारय ब) द्वंद क) द्विगू ड) अव्ययीभाव
7. खालीलपैकी संख्या विशेषणाचा प्रकार ओळखा.
   अ) आंबट आंबा ब) तुझी वही क) चौपट फळे ड) वरचा मजला
8. 'वारा' या शब्दाचा समानार्थी शब्द कोणता?
   अ) सुधांशु ब) भानू क) गगन ड) पवन
9. शाप या शब्दाचा विरूध्दार्थी शब्द निवडा.
   अ) उःशाप ब) वरदान क) निशाप ड) अशाप
10. पुल्लिंग शब्द ओळखा.
    अ) ग्रंथ ब) पुस्तक क) कादंबरी ड) मगर

**II पहिल्या दोन पदातील संबंध ओळखून तिसऱ्या पदाचा योग्य संबंध लिहा. 5X1=5**

11. सदाचार : व्यंजन संधी : : सूर्योदय : _______
12. पासनापास : द्वंद समास : : यथाशक्ती : _______
13. देव आहे असे मानणारा : आस्तिक : : दररोज प्रसिध्द होणारे : _______
14. ' ' : एकेरी अवतरण : : " " : _______
15. गांधीजी : महात्मा : : संत तुकडोजी : ___________

**III पुढील प्रश्नांची एका वाक्यात उत्तरे लिहा.** **8X1=8**

16. सोंड पाहणाऱ्यास हत्ती कसा वाटला?
17. दैवी शक्ती कोणती?
18. जपानी स्त्री कशी आहे?
19. डॉक्टरांनी मुलाला कोणता प्रश्न विचारला?
20. तात्यांच्या घरी पंचमंडळी का जमली होती?
21. आईने थळोबास कोणता नवस केला?
22. कोणत्या हेतूला समाजसेवकांनी संक्षेप दिला?
23. गाई कोण हाकतो आहे?

**IV खालील प्रश्नांची उत्तरे सुचनेप्रमाणे लिहा.** **3X2=6**

24. वाक्यप्रचाराचा अर्थ सांगून वाक्यात उपयोग करा.
    अ) अवसान जाणे ब) गयावया करणे
25. अलंकार ओळखून लक्षणे लिहा.
    सावळाची रंग तुझा पावसाळी नभापरि
26. गण पाडून वृत्त ओळखा
    तुझे कारणी देह माझा पडावा

**V खालील प्रश्नांची उत्तरे दोन–तीन वाक्यात लिहा.** **12X2=24**

27. आंधळ्यांनी हत्तीचे वर्णन कसे केले आहे?

    **किंवा**

    अनंतशक्ती परमेश्वरू या कथेचे तात्पर्य लिहा.
28. कृष्णाजी विनायक सोहनी यांचा परिचय लिहा.
29. सर्व सरदारांनी चिमाजी आप्पांना काय सांगितले?
30. विद्या महासागरासारखी आहे म्हणजे काय?

    **किंवा**

    आत्मविश्वासाने आंबेडकरांनी काय मिळविले?
31. काकूंचा आकांत पाहून शेजाऱ्यांना काय वाटले?
32. "भजन आणि भोजन एवढच तुम्हाला करता येत वाटतं" संदर्भासहित स्पष्टीकरण द्या.
33. शिशूपालाच्या रक्षणासाठी कोणकोण आले होते?
34. 'केली व्रते नियमही धरले विशेषी' संदर्भासहित स्पष्ट करा.
35. होमामध्ये काय–काय जाळतात?
36. ढोंगी भक्ताचे हरिशी संबंध कसे आहेत?
37. कवी केशवकुमार यांचा परिचय लिहा.
38. पाहुण्यांचे वर्णन कसे आहे?

**VI खालीलपैकी कोणत्याही एका कल्पनेचा विस्तार करा.** **1X3=3**

39. अ) वाचाल तरच वाचाल ब) माणुसकी हाच खरा धर्म

**VII खालील प्रश्नांची उत्तरे पाच सहा वाक्यात लिहा.** **13X3=39**

40. छत्री आपण दुसऱ्यासाठी घेतो असे लेखक का म्हणतो?
41. जपानमधील क्लबच्या पार्टीचे वर्णन करा.
42. शिबीर घेण्यासाठी येणारे शिक्षक नाखूष का असत?
43. वाटणीच्या घोळाने घरात काय घडत होते?
44. धारवाडच्या राष्ट्रीय विद्यालयात वातावरण कसे होते?
45. लेखकाबरोबर भांडण झाल्यावर आई काय म्हणे?
46. पैल तो गे ................ कवितेचा सारांश थोडक्यात लिहा.
47. समाजसेवक कोणते काम करतात?
48. उद्योगी तरूण कसा असला पाहिजे?
49. गुराखी कृष्ण झाला नाही असे कवी का म्हणतो?
50. धरण कवितेतील स्त्रीच्या गरीबीचे वर्णन करा.
51. स्त्रीयांच्या कष्टांना कष्टाची माळ का म्हटले आहे?
52. पाठ आणि पोट .............. कवितेचा सारांश थोडक्यात लिहा.

**VIII खालील प्रश्नांची उत्तरे आठ दहा वाक्यात लिहा.** **4X4=16**

53. जांभूळ, चाफा, गुलमोहर या झाडाबद्दल लेखकाच्या कोणत्या आठवणी आहेत?

**किंवा**

हिरवे सांगाती या पाठात आलेल्या वृक्षांची वैशिष्ट्ये लिहा.

54. सावित्रीबाई खऱ्या अर्थाने सहधर्मचारिणी होत्या. स्पष्ट करा.
55. पृथ्वी–सूर्य, चंद्र–पृथ्वी यांचा संवाद तुमच्या शब्दात लिहा.

**किंवा**

पृथ्वीचे प्रेम मिळावे म्हणून कोण – कोण कसे प्रयत्न करत आहेत.

56. खालील कवितेच्या ओळी पूर्ण करा.

कवच भूमिचे..................................................

........................................................................

........................................................................

.............................................. जीवनसाक्षात्कार

**IX पुढे दिलेला उतारा वाचून त्याखालील दिलेल्या प्रश्नांची उत्तरे तुमच्या शब्दात लिहा. 1X4=4**

57. केल्विनचे वडिल प्राध्यापक होते केल्वीन केवळ दहा वर्षाचा असताना तो वडिलांना अवघड अवघड उदाहरणे सोडवून दाखवायचा. एकदा एक अवघड उदाहरण त्याच्या वडिलांना अडले. रात्री जेवणानंतर ते उदाहरण सोडविण्यात केल्विन गर्क झाला आणि मध्यरात्रीच्या सुमारास त्याने ते उदाहरण सोडविले. असा तो बुध्दीमान व जिद्दी होता. बाराव्या वर्षी त्याने देवाचा संवाद या लॅटिन पुस्तकाचे भाषांतर करून बक्षिस मिळविले. सोळाव्या वर्षी त्याने पृथ्वीचे स्वरूप या विषयावर एक प्रबंध लिहिला. इतक्या लहान वयात त्याने

केवढे अफाट कार्य केले! लहान वयातील त्याचे हे कार्य पाहून आपण त्याला ‘इंग्लंडचा ज्ञानेश्वरच’ म्हणूया.

प्रश्न :– 1) ज्ञानेश्वरांना आपण एवढे महान का समजतो?

2) केल्विन बुध्दीमान व जिद्दी होता. हे कशावरून वाटते?

**X खालीलपैकी कोणत्याही एका विषयावर पत्र लेखन करा. 1X5=5**

58. तुमच्या सहलीचे वर्णन करणारे पत्र तुमच्या आईला लिहा.

**किंवा**

तुम्ही स्नेहसंमेलन कसे साजरे केलात हे तुमच्या मित्राला पत्राने कळावे.

**XI खालीलपैकी कोणत्याही एका विषयावर पंधरा ते वीस ओळी निबंधलेखन करा. 1X5=5**

59. आमचे राष्ट्रीय सण

**किंवा**

वृक्षवल्ली आमचे सखे